दुर्गे दुर्घट भारी (देवीची आरती)

Durge Durghat Bhari Aarti

Source: Internet Archive — Navanit, Government Central Book Depot, Bombay (1878), leaf 379 / printed page 373, आरती देवीवरची (selected witness). Also compared: Internet Archive — Navanit, 1882 recension, sixth edition (1910), leaf 475 / printed page 455 (visual comparison).

VERSE 1

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं ॥ अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी ॥
वारी वारी जन्म मरणातें वारीं ॥ हारीं पडलों आतां संकट निवारीं ॥ १ ॥
जयदेवी जयदेवी महिषासुरमथनी ॥ सुरवर ईश्वर वर दे तारक संजिवनी ॥ ध्रु० ॥

Durge Durghat Bhari Tujvin Sansari || Anathnathe Ambe Karuna Vistari ||
Vari Vari Janma Maranate Vari || Hari Padlo Aata Sankat Nivari || 1 ||
Jaydevi Jaydevi Mahishasurmathani || Survar Ishvar Var De Tarak Sanjivani || Dhru ||

VERSE 2

त्रिभुवन भवनीं पाहतां तुजऐशी नाहीं ॥ चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं ॥
साही विवादितां पडले प्रवाहीं ॥ तें तूं भक्तालागीं पावसि लवलाहीं ॥ २ ॥ जय० ॥

Tribhuvan Bhavani Pahata Tujaishi Nahi || Chari Shramle Parantu Na Bolve Kahi ||
Sahi Vivadita Padle Pravahi || Te Tu Bhaktalagi Pavasi Lavlahi || 2 || Jay ||

VERSE 3

प्रसन्न वदनें प्रसन्न होसी निजदासा ॥ क्लेशा पासुन सोडीं तोडीं भवपाशा ॥
अंबे तुज वांचून कोण पुरवील आशा ॥ नरहरि तल्लीन झाला पद पंकजकोशा ॥ ३ ॥ जयदेवी० ॥

Prasanna Vadane Prasanna Hosi Nijdasa || Klesha Pasun Sodi Todi Bhavpasha ||
Ambe Tuj Vanchun Kon Purvil Aasha || Narhari Tallin Jhala Pad Pankajkosha || 3 || Jaydevi ||